## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यीपीठ)
**गणेशखिंड, पुणे – ४११००७**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील भोजनगृहांमधील अन्न पुरवठ्याबाबत.**

## जाहीर प्रकटन

मार्च २०२६ मधील आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतात सी.एन.जी. (C.N.G.) आणि एलपीजीचा (L.P.G.) मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. घरगुती वापरासाठी (P.N.G.) पुरवठा टिकवून ठेवण्याची काळजी म्हणून सरकारने औद्योगिक क्षेत्राला गॅस पुरवठा कमी केला आहे.

उपरोक्त सर्व परिस्थितीचा विपरित परिणाम जवळपास ५००० रहिवासी विद्यार्थी असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिसरातील खाणावळी व उपाहारगृहांवर झाला आहे.

या प्रकटनाद्वारे विद्यापीठातील खाणावळींमध्ये भोजन घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, मा. सहसचिव, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना केंद्र शासनाच्या दि. ०९/०३/२०२६ रोजीच्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थाना १००% गॅस सिलेंडरचे वाटप करण्याची कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत तसेच या अनुषंगाने विद्यापीठाकडूनही मा. जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा यांनादेखील पत्राद्वारे विनंती करण्यात आलेली आहे.

याबरोबरच विद्यापीठातील भोजनगृहांमध्ये अन्नपुरवठा करण्यासाठी विद्यापीठस्तरावर संपूर्ण क्षमतेने प्रयत्न करण्यात येत असून, भोजनगृहांमध्ये भोजन घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी याबाबत निश्चिंत रहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

प्रभारी कुलसचिव
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

दिनांक : १४/०३/२०२६
गृ.व्य./जा.क्र/३९१/२०२६